**योजनेचे नांव :- क वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजना**

१) योजना कोणाची :- जिल्हा वार्षिक योजना

२) योजनेची संक्षिप्त माहिती :-

शासन निर्णय क्र.तिर्थवि/2011/प्र.क्र.651/यो-7 दि.16 नोव्हे.2012

योजनेच्या मार्गदर्शक सुचना व शासन निर्णया प्रमाणे या योजने अंतर्गत खालील प्रमाणे कामे हाती घेता येतात. :-

१. यात्रास्थळा पासून ते मुख्य रस्त्या पर्यतचा पोहोच रस्ता (जास्तीत जास्त 800 मिटर)
२. पोहोच रस्त्यावर पथदिवे उभारणे
३. पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे व नळाद्वारे पाणी पुरवठा करणे
४. तिर्थक्षेत्र नदी किंवा ओढयाजवळ असेल तर संरक्षण भिंत बांधणे.
५. शौचालय व स्नानगृह बांधणे
६. परिसर सुधारणा अंतर्गत(झाडे लावणे , आवश्यक त्याठिकाणी पेव्हींगब्लॉक बसविणे)
७. वाहनांसाठी पेव्हींगब्लॉकसह वाहनतळ बांधणे
८. यात्रास्थळापासून अंतरावर भक्तनिवास बांधणे .

३) योजनेचे निकष व अटी शर्ती

१. यात्रास्थळास जिल्हा नियोजन समितीने क वर्ग यात्रास्थळास दर्जा देणे आवश्यक
२. ग्रामपंचायतीची मागणी , ठराव
३. ग्राम पंचायत मालकीच्या जागेचा उतारा
४. निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नांेद असलेला ग्रा.प.नमुना नं.26 चा उतारा
५. समजुतीचा नकाशा
६. जि.प.सर्वसाधारण सभेच्या शिफारशीने जिल्हा नियोजन समितीची मान्यता

४) योजनेचे फायदे

- यात्रास्थळांच्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध झालेने भाविकांची सोय होण्यास मदत
- पर्यटकांची/भाविकांची संख्या वाढल्याने स्थानिक रोजगार निर्मिती होण्यास मदत.